


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ८६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.०८ नोव्हेंबर २०२४

## सत्ता हातात द्या पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, मुंबई :** विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबरच्या दिवसाकडे अनेकांचे लक्ष लागलेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. सध्या राज्यभरात विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा सुरु आहेत.

या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचंही पाहायला मिळत आहे. आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची मुंबईतील वरळी मतदारसंघात जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला. तसेच यावेळी राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मशिदीवरचे भोंगेच्या विषयावरून मोठं भाष्य केलं आहे. सत्ता हातात द्या, पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

**राज ठाकरे काय म्हणाले?**

उद्धव ठाकरे कसे मुख्यमंत्री झाले हे सर्वांना माहिती आहे. सध्याच्या काळात काहीही विचारधारा उरलेली नाही. २०१९ नंतर कोणाचं सरकार येणार? हेच आपण पाहत बसलो होतो. एकेदिवशी सकाळी ६ वाजता कळलं की अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत आहेत. आधी तर विश्वासच बसला नाही. आर्धा तास ते लग्न टिकलं. आर्ध्या तासाच घटस्फोट झाला. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर गेले. मग यांना काही जणाची नाही आणि मनाची नाही.

ज्यांच्या विरोधात निवडणुका लढवल्या त्यांच्या बरोबर सत्तेत जाऊन बसले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर अडीच वर्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या अनेक बॅनर्सवरील नावापुढंचं हिंदूहृदयसम्राट हे नाव काढलं. हे का काढलं तर राष्ट्रवादी आणि काँग्रेसला वाईट वाटेल आणि त्यांना ते परवडणारं नाही. तसेच काही उर्दू बॅनर्सवर जनाब बाळासाहेब ठाकरे नाव टाकलं. आज ते हयात असायला हवे होते. त्यांनी एकएकाला फोडून काढलं असतं, असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला.

आज काही मौलवी फतवे काढत आहेत. काय फतवे काढत आहेत? तर सर्वच्या सर्व मते हे महाविकास आघाडीच्या पारड्यात टाकावी. जर ते फतवे काढत असतील तर आज मी देखील फतवा काढतो. येणाऱ्या निवडणुकीमध्ये माझे ज्या मतदारसंघात उमेदवार असतील तेथे जनतेने आमच्या पाठीशी उभे राहावं. उद्या सत्ता हातात दिल्यानंतर पहिल्या ४८ तासांत सर्व मशिदीवरचे भोंगे पहिल्या पहिल्या ४८ तासांत खाली उतरवले ना? तर परत राजकारण सांगणार नाही. जर त्यांनी अंगावर येण्याचा प्रयत्न केला तर हे आमच्या खाकी वर्दीतले आहेत ना त्यांना आदेश देईल आणि ते रजा अकादमीचा बदला घेऊन टाकतील, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

## मागास अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आठ जणांना जन्मठेप !

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, सोलापूर :** ओळखीच्या माध्यमातून एका मागासवर्गीय अल्पवयीन मुलीशी सलगी करून तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याबद्दल पाच रिक्षाचालकांसह आठ जणांना दुहेरी जन्मठेप, तर अन्य तिघा आरोपींना २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सोलापूरच्या जिल्हा सत्र न्यायालयाने ठोठावली आहे.

सचिन श्रीकांत राठोड (वय २४), प्रवीण श्रीकांत राठोड (वय २२), गणेश ऊर्फ अक्षय विष्णू चव्हाण (वय २२, तिघे रा. प्रतापनगर लमाण तांडा, विजापूर रोड, सोलापूर), करण विजयकांत भरले (वय १९, रा. सोरेगाव, सोलापूर), गौरव विलास भोसले (वय ३०, रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर) या सर्व रिक्षाचालकांसह राज ऊर्फ राजकुमार सिद्राम देसाई (वय ३३, रा. एसटी कॉलनी, नवीन आरटीओजवळ, सोलापूर), दिनेश परशु राठोड (वय १९), सतीश अशोक जाधव (वय ३०), रोहित श्याम राठोड (रा. प्रतापनगर लमाण तांडा, सोलापूर) अशी शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यातील आरोपी सचिन राठोड, राज ऊर्फ राजकुमार देसाई आणि गौरव भोसले यांना प्रत्येकी २० वर्षे सक्तमजुरी सुनावण्यात आली. तर अन्य आठ आरोपींना जन्म ठेप ठोठावण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी या खटल्याचा निकाल सुनावला. या खटल्यातील पीडित अल्पवयीन मुलगी मागासवर्गीय समाजाची असून, ती ऑगस्ट २०१९पासून सोलापुरात एका शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असताना तिच्याशी रिक्षाचालक आरोपी सचिन राठोड याची ओळख झाली होती. नंतर त्याचे रूपांतर प्रेमात झाले होते. त्यातूनच त्याने लग्नाचे आमिष दाखवून



पीडित मुलीला एका लॉजमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले होते. असे प्रकार दोन-तीन वेळा झाल्यानंतर त्यात आरोपी सचिन राठोड याचे अन्य साथीदार सहभागी झाले.

जुळे सोलापुरात तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्यानंतर सर्व आरोपी पुन्हा चटावले होते. त्यातून शारीरिक व मानसिकदृष्ट्या खचलेल्या पीडित मुलीने आपल्यावरील अत्याचाराला वाचा फोडली. तिच्या फिर्यादीवरून विजापूर नाका पोलीस ठाण्यात सर्व आरोपींविरुद्ध अॅट्रॉसिटी कायद्यासह बाललैंगिक शोषण कायद्याखाली गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा घडल्यानंतर सर्व आरोपी कर्नाटकात लपून बसले होते. शहराचे तत्कालीन पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी या गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन सखोल तपासाचा आदेश दिला होता. तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे यांनी तपास केला.

या खटल्यात जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांनी ३८ साक्षीदारांची तपासणी केली. यात पीडित मुलीसह तिची आई, वैद्यकीय अधिकारी, पोलीस तपास अधिकारी आदींची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. आरोपींतर्फे नागराज शिंदे, इस्माईल शेख, सुरेश चव्हाण, एस. एम. झुरळे, फिरोज शेख या वकिलांनी बाजू मंडली..जिल्हा सरकारी वकील राजपूत यांनी केलेला युक्तिवाद मान्य करून न्यायालयाने सर्व आरोपींना दोषी धरून शिक्षा सुनावली.

## अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर मोक्कातंर्गत कारवाईची मागणी...

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.७, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यातील मौजे पोखरी (पवळदरा) भागात शासकीय व खाजगी जमिनीतून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन झाले असताना सदर जागेचा पंचनामा करून वाळूतस्करांवर दंडात्मक कारवाई करुन गुन्हे दाखल करावे व मोक्कातंर्गत कारवाई करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या मागणीचे निवेदन संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे व पारनेर तालुकाध्यक्ष निवृत्ती कासुटे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले. पारनेर तालुक्यातील मौजे पोखरी (पवळदरा)येथील तलाठी व मंडळाधिकारी यांच्या संगणमाताने गट नंबर ४३२ मध्ये सरकारी व खाजगी जमिनीतून मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन करून मोठ्या स्वरूपात साठा करण्यात आला आहे. अनेक दिवसापासून हे उत्खनन सुरू असून, त्याचा त्रास पोखरी भागातील अनेक शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. अवैध वाळू उपसाच्या वाहतुकीमुळे या भागातील अनेक पक्के डांबरी रस्ते खराब झाले आहेत.

भरधाव वेगाने जाणाऱ्या वाळूच्या गाड्यांनी अनेकांना उडवले असताना देखील वाळूमाफीयांच्या दहशतीमुळे पोलीस स्टेशनला अपघाताची नोंद केली जात नाही. मोठ्या प्रमाणात हप्ते वसुलीकरुन हा व्यवसाय पारनेर तालुक्यात खुलेआम सुरू असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. पारनेर तालुक्यातील मुळा, काळू, कापरी नदीत मोठ्या प्रमाणात उत्खनन चालू असून, त्याचे मोजमाप सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मार्फत करण्यात यावे, संबंधित ठिकाणी उत्खननाचे स्पॉट पंचनामे करून त्याचे मोजमापद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात यावी, संबंधीतांवर भारतीय दंड संहिता कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करून संघटीत गुन्हेगारी विरुद्ध मोक्कातंर्गत अधिनियमान्वये कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा संबंधित नदी पात्रात समीती व संघटनेच्या माध्यमातून आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## राज्यात तीन भाऊ, मिळून महाराष्ट्र खाऊ : उद्धव ठाकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०७, अमरावती :** महाविकास आघाडी सरकारचे काम सुरळीत सुरू असताना गद्दारी करून हे चांगले सरकार पाडण्यात आले. महायुतीने अडीच वर्षे काहीच केले नाही. जनाधार कमी होत चालल्याचे पाहून निवडणुकीच्या तोंडावर यांचे बहिणींसाठी प्रेम उफाळून आले आहे. राज्यात देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊ हे तीन भाऊ आहेत. त्यांच्यात भाऊबंदकी आहे. पण, तरीही ते एकत्र फिरताहेत. आपण तिघे भाऊ, मिळून महाराष्ट्र खाऊ, असेच त्यांचे वर्तन आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दर्यापूर येथे बोलताना केली. दर्यापूर येथे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे उमेदवार गजानन लवटे यांच्या प्रचारार्थ गुरूवारी दुपारी आयोजित सभेत ते बोलत होते. सभेला काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे, आमदार यशोमती ठाकूर आदी उपस्थित होते. उद्धव ठाकरे म्हणाले, देवाभाऊ, दाढीभाऊ आणि जॅकेटभाऊंनी महिलांसाठी योजना जाहीर केली, पण महिलांच्या सुरक्षेचे काय. बदलापूरमध्ये एका चिमुकल्या मुलीवर शाळेत अत्याचार होतात. तिच्या आईची तक्रारही नोंदवून घेतली जात नसेल, तर पंधराशे रुपयांची मदत चाटायची का, असा सवाल त्यांनी केला. या तीन भावांनी पीडित मुलीच्या आईची भेट घेऊन त्यांना पंधराशे रुपयांची मदत देऊन पहावी. पायताणाने तोंड फुटल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केले.

## दारूपिण्यासाठी कमी पैसे दिले...
## बापाने मुलाला दिल्या शिव्या म्हणून मुलाने बापाला संपवले...

**अक्षराज : निलेश कासट**
**दि.०७, पालघर :** दारू पिण्यासाठी कमी पैसे दिल्याने बापाने मुलाला शिव्या दिल्याने रागाच्या भरात पोटच्या मुलाने बापाचा गळा आवळून खून केला. लक्ष्मण गोरखना असे मयत पित्याचे नाव असून नागझरी बऱ्हाणपूर रस्त्यावरील बोरशेती गावातील अस्वलीपाड्यात राहत होते. सोमवारी दुपारी मयत लक्ष्मण मुकुंद गोरखना यांना त्याचा मुलगा सुरेश गोरखना याने दारू पिण्यासाठी फक्त दहा रुपये दिले, म्हणून शिव्या दिल्याने आरोपी सुरेश याला राग आला होता, त्याने घरातील भाताचे भारे बांधण्याच्या दोरीने लक्ष्मण गोरखना यांना गळा आवळून ठार मारले. याप्रकरणी मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी लक्ष्मण मुकुंद गोरखना याच्या मृत्यू बाबत त्याची पत्नी पुनम आणि मुलगी सपना यांनी दिलेल्या माहिती नुसार सोमवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घराच्या पाठीमागील शेतातील भात कापणीचे काम करून घरी पोहोचल्या नंतर लक्ष्मण गोरखना याने मुलगा सुरेश याच्याकडून दारु पिण्यासाठी पैसे मागितले असता सुरेशने त्यांना दहा रुपये दिले. दारु पिऊन परतल्यावर दारू पिण्यासाठी दिलेले दहा रुपये कमी वाटल्याने सुरेशला शिव्या द्यायला सुरुवात केली होती. दिवाळीचा सण असताना वडिलांना दहा रुपये देतो तसेच आई वडिलांवर लक्ष देत नसल्याचे सांगत मोठयाने शिव्या द्यायला सुरुवात केली होती. त्यामुळे राग आल्याने सुरेशने त्याचे वडील लक्ष्मण याला मारहाण केली. त्यानंतर दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास भाताचे भारे बांधण्याच्या दोरीने घराच्या पाठीमागे बसलेल्या लक्ष्मण गोरखना यांचा गळा दोरीने आवळल्याने बेशुध्द झाले होते. बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी मनोरच्या ग्रामीण रुग्णालयात नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लक्ष्मण गोरखना यांचा मृत्यू झाल्याचे घोषीत केले. आरोपी सुरेश याने घरातील भाताचे भारे बांधण्याच्या दोरीने मयत त्याचे वडील लक्ष्मण गोरखना याला गळा आवळून ठार मारल्या प्रकरणी बोरशेती गावाचे पोलीस पाटलांनी दिलेल्या फिर्यादी वरून आरोपी सुरेश गोरखना याच्या विरोधात मनोर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोप सुरेश याला मनोरपोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात ३४ हजार हेक्टरवर कांदा लागवड
## उन्हाळी कांदा लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.७, अहिल्यानगर :** जिल्ह्यात यंदा चांगल्या पावसाच्या स्थितीमुळे तसेच यंदा कांद्याची दर स्थितीही बरी असल्याने खरिपात दरवर्षीच्या तुलनेत कांदा लागवड वाढली आहे. दरवर्षी साधारण २० ते २२ हजार हेक्टरवर कांदा लागवड होत असते. यंदा आतापर्यंत खरिपात ३४ हजार २४२ हेक्टरवर कांदा लागवड झाल्याचा कृषी विभागाने खरीप अंतिम पेरणी अहवाल स्पष्ट केले आहे. नगर जिल्ह्यात अलीकडच्या काही वर्षांपासून कांदा लागवडीचे क्षेत्र वाढत आहे. खरिपातसह रब्बी, आणि उन्हाळी लागवडीला शेतकरी प्राधान्य देत आहेत. प्रामुख्याने गावरान कांद्याची लागवड अधिक होते. गेल्या वर्षी दोन वर्षांचा विचार केला तर खरिपासह रब्बी व उन्हाळी हंगामात मिळून दोन लाख हेक्टरच्यावर कांदा लागवड क्षेत्र झालेले आहेत. यंदा जिल्ह्याच्या बहुतांश भागात पावसाची स्थिती चांगली आहे. गेल्या काही काळापासून कांदा दरात चढउतार होत असला तरी गेल्या काही महिन्यांपासून कांदा दरही बऱ्यापैकी मिळत आहे. त्यामुळे यंदा खरिपात कांदा लागवडी वाढल्या आहेत. यंदा खरिपात कांद्याची नगर जिल्ह्यात यंदा सुमारे ३४ हजार २४२ हेक्टरवर लागवड झाली आहे. त्यात नगर तालुक्यात ४६२२ हेक्टर, पारनेर तालुक्यात ४६७३ हेक्टर, श्रीगोंदा तालुक्यात ६३०९ हेक्टर, कर्जत तालुक्यात ९२१० हेक्टर, जामखेड तालुक्यात २७०९ हेक्टर, शेवगाव तालुक्यात १३९ हेक्टर, पाथर्डी तालुक्यात ३९४४ हेक्टर, नेवासा तालुक्यात २७५ हेक्टर, राहुरी तालुक्यात ११२ हेक्टर, संगमनेर तालुक्यात २०४० हेक्टर व राहाता तालुक्यात २११ हेक्टरवर लागवड झाली आहे. अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर तालुक्यात यंदा खरिपात कांदा लागवड झाली नाही.

## ठाणे आयुक्तालयाकडुन ११ सराईत गुन्हेगार तडीपार

**अक्षराज : विकास दळवी**
**दि.०७, ठाणे :** आगामी विधानसभा निवडणुक आचारसंहिता पाश्वभूमीवर ठाणे शहर पोलिस आयुक्तालयाने कार्यक्षेत्रातील ११ सराईत गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली आहे.दंगल घडविणे, हाणामारी करणे तसेच न्यायालयाने शिक्षा केलेल्या गुंडांचा हद्दपारीमध्ये समावेश असल्याची माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त डॉ. पंजाब उगले यांनी दिली. निवडणुक काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये. मतदारांवर प्रभाव किंवा दबाव टाकला जाऊ नये, यासाठी ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर आणि वागळे इस्टेट या पाच परिमंडळातील ३५ पोलिस ठाण्यातील टॉप टेन गुंडांची यादी काढली होती. निवडणुक काळात उपद्रवी ठरू शकणा-या १०५ गुंडांच्या हद्दपारीचे प्रस्ताव तयार केले होते. या प्रस्तावांची सहाय्यक पोलिस आयुक्तांमार्फत चौकशी झाल्यानंतर गेल्या महिनाभरात ११ गुंडांवर तडीपारीची कारवाई पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी केली आहे. यामध्ये ठाण्यातुन चार भिवंडीतुन तीन तर कल्याण, उल्हासनगर आणि वागळे इस्टेट मधील प्रत्येकी एकाचा यामध्ये समावेश आहे.

अक्षराज

२ | बुलडाणा, शुक्रवार, दि.०८ नोव्हेंबर २०२४ | विविधा




### विद्यार्थी दिन...

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासम ोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!

# फिर एक बार 'ट्रम्प सरकार'

जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या ६० व्या निवडणुकीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी चे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी अनपेक्षितपणे विजय मिळवला.

अनेपेक्षित या अर्थाने म्हणतो की या निवडणुकीत त्यांच्या प्रतिस्पर्धी डेमॉक्रटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांनाही विजयाचे दावेदार समजले जात होते. या निवडणुकीत दोघांच्यातही जोरदार रस्सीखेच होती. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात दोन्ही उमेदवारात काटे की टक्कर दाखवण्यात आलो होती. दोन्ही उमेदवारांची जिंकण्याची शक्यता पन्नास पन्नास टक्के व्यक्त करण्यात आली होती. जो जिंकून येईल तो अगदी काट्यावर निवडून येईल असे मानले जात होते त्यामुळेच ट्रम्प इतक्या घवघवीत मतांनी जिंकून येतील असे कोणालाही वाटले नव्हते. ट्रम्प यांनी तब्बल २७७ इलेक्ट्रोल मत मिळवत कमला हॅरिस यांचा दारुण पराभव करत अमेरिकेत फिर एक बार 'ट्रम्प सरकार' आणले. फिर एक बार असे मी म्हणालो कारण २०१६ ते २०२० असे चार वर्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार अमेरिकेत होते. २०२० साली म्हणजे मागील निवडणुकीत त्यांचा ज्यो बायडेन यांनी



दारुण पराभव केला होता. यावेळी मात्र त्यांनी त्या पराभवाचे पुरेपूर उट्टे काढले आणि अमेरिकेवर पुन्हा एकदा स्वतःचे वर्चस्व सिद्ध केले. अर्थात त्यांचा हा विजय का झाला हे देखील तपासून पहावा लागेल.


डोनाल्ड ट्रम्प यांनी आक्रमक प्रचार करताना अमेरिका फर्स्ट या धोरणाचे जोरदार समर्थन केले. डोनाल्ड ट्रम्प हे कट्टर उजव्या विचारसणीचे आहेत त्यांनी आपल्या प्रचारात हा मुद्दा जोरदारपणे मांडला. आपल्या देशातील समस्यांना अन्य देशातून आलेले स्थलांतरित जबाबदार आहेत. ज्यो बायडेन यांच्या काळात अन्य देशातून अनेक लोक अमेरिकेत आले त्यामुळे अमेरिकेतील स्थानिक नागरिकांचा रोजगार हिरावला गेला असा जोरकस प्रचार त्यांनी केला त्यांचा हाच प्रचार त्यांच्या पथ्यावर पडला आणि तरुणांनी त्यांना भरभरून मते दिली. त्यांनी केलेला आयातीला विरोध आणि आयात उत्पादनावर कर वाढवण्याची केलेली घोषणा ही मतदारांना पटली. अमेरिकने अन्य देशांच्या भांडणात पडण्याची गरज नाही हे त्यांचे मतही जनतेला पटले. तसेच त्यांचा चीन आणि रशियाला असलेला विरोध जगजाहीर आहे. अमेरिकेला मागे सारून चीन जागतिक महासत्ता होऊ पाहत आहे आणि त्यांना रशिया सहाय्य करत असताना ज्यो बायडेन हातावर हात ठेवून बसले आहेत असे चित्र गेली चार वर्ष दिसत होते. चीन आणि रशियाच्या वाढत्या वर्चस्वाला शह द्यायचा असेल तर डोनाल्ड ट्रम्प सारखा आक्रमक नेताच देशाचा राष्ट्राध्यक्ष हवा असे मत अमेरिकन नागरिकांचे बनले त्यात रशिया - युक्रेन आणि इस्राईल - पॅलेस्टाईन युद्धात बायडेन यांनी स्वीकारलेले बोटचेपे धोरण मतदारांना रुचले नाही म्हणूनच अमेरिकन मतदारांनी पुन्हा एकदा ट्रम्प यांच्या हाती सत्ता दिली आणि कमला हॅरिस यांना नाकारले. कमला हॅरिस यांनी ट्रम्प यांना जोरदार टक्कर देण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही ज्यो बायडेन यांनी खूप उशिरा त्यांची उमेदवारी घोषित केली त्यामुळे त्यांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. कमला हॅरिस यांचा पराभव हा ज्यो बायडेन यांच्यामुळेच झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण ज्यो बायडेन यांची चार वर्षाची कारकीर्द निराशाजनक अशीच होती. अमेरिकेतील सर्वात निष्क्रिय राष्ट्राध्यक्ष अशी अमेरिकेच्या इतिहासात त्यांची नोंद होईल इतकी निराशाजनक कामगिरी त्यांची होती. महागाई, बेरोजगारी, शस्त्र संस्कृती याबाबत त्यांनी दिलेले एकही आश्वासन त्यांना पूर्ण करता आले नाही. बेकायदेशीर स्थलांतरितांचा प्रश्न त्यांना व्यवस्थित हाताळता आला नाही त्यामुळे तरुणांम ध्ये त्यांच्या विषयी रोष होता तो त्यांनी मतपेटीतून व्यक्त केला. सगळ्यात महत्वाचे म्हणजे २१ व्या शतकातही अमेरिकेन नागरिक एका कृष्णवर्णीय म हिलेला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारण्यास तयार नाही या आणि यासारख्या अनेक कारणांमुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय सोपा झाला आणि ते पुन्हा एकदा फिर एक बार 'ट्रम्प सरकार' म्हणत सत्तेवर आले.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# निवडणूका आणि आश्वासने !

निवडणूक मग ती ग्रामपंचायतीची असो वा विधानसभेची. एकदा तारखेची घोषणा झाली कि समस्त प्रमुख प क्ष तयारीला लागतात. इच्छुक उमेदवार पक्षश्रेष्टींचे निवडणूका म्हणजे लोकशाहीच महोत्सव. काहीजण याकडे युद्ध म्हणूनही पाहतात. प्रेमात आणि युद्धात साम, दाम, दंड, भेद सर्वकाही माफ असते त्याप्रमाणे निवडणुकांम ध्ये या सर्व बाबींचा समस्त पक्षांकडून कमी अधिक प्रमाणात वापर केलाच जातो.

अनेक इच्छुक उमेदवार बाशिंग बांधून तयार असताना कोणालाही न दुखावता त्यापैकी एकालाच पक्षाचे तिकीट देऊन इतरांना कसे सांभाळायचे यामध्ये पक्षश्रेष्टींच्या अनुभवाचा कस लागतो. एखादा नेता आपल्या पक्षाशी किंवा स्थानिक जनतेशी किती प्रमाणात प्रामाणिक आहे हे खरेतर




निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यावरच कळते. एरव्ही शेवटच्या श्वासापर्यंत पक्षाचे काम करण्याच्या बतावण्या करणारी नेतेमंडळी पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून एका रात्रीत पक्ष बदलायला मागेपुढे पाहत नाहीत. एखादा नेता परिसरात नावाजलेला असला कि त्याला गळाला लावण्यासाठी अन्य पक्षही फासे टाकून बसलेलेच असतात. यंदा ही रस्सीखेच पाहायला मिळाली. निवडणुकांच्या तोंडावर म तदारांना आकृष्ट करण्यासाठी समस्त पक्षांकडून त्यांचे जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. ज्याम ध्ये आश्वासनांचा पाऊस पाडलेला असतो.

या आश्वासनांमध्ये विकासासोबत महागाई नियंत्रण, जातीय आरक्षण, शेतकऱ्यांना कर्जमाफी, तरुणांना रोजगार, महिला सबलीकरण यांसारख्या अनेकविध बाबींचा प्रामुख्याने समावेश केलेला असतो. पक्षांच्या जाहीर सभांतूनही आम्हीच कसा राज्याचा विकास घडवू शकतो, आम्हीच कसे जनतेचे तारणहार आहोत याच्या बतावण्या केल्या जातात. निवडणुका पार पडल्यानंतर सत्तेत आलेल्या पक्षाला या आश्वासनांचा सोयीस्कर विसर पडतो. मधले काही दिवस विरोधकांची उणीधुणी काढली जातात. निवडणूका जवळ आल्या कि पुन्हा विकास कामांना सुरुवात होते. वर्षोनुवर्षे भारतात हेच सुरु आहे. नेत्यांच्या आश्वासनांना सामान्य जनता बळी पडते. कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी परिस्थितीत फारसा बदल होत नाही. निवडणूक आयोगाने गेल्या काही वर्षांत निवडणुकीनिमित्त केल्या जाणाऱ्या खर्चावर आणि पद्धतींवर बंधने आणल्यामुळे तसेच पूर्वीच्या तुलनेत आचारसंहिता अधिक कडक केल्याने निवडणूक प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी शिस्त आली आहे'; मात्र आश्वासने देण्यावर कोणतेही बंधन नसल्याने पक्षांचे फावते. वास्तविकतः निवडणुकांच्या तोंडावर दिल्या जाणाऱ्या आश्वासनांवरसुद्धा बंधने असायला हवीत.

राजकीय पक्ष देत असलेली आश्वासने कशी पूर्ण करणार, त्यासाठी आर्थिक नियोजन कसे असणार, किती कालावधीत त्यांची पूर्तता करणार, आश्वासनांपैकी किती बाबींची जनतेला खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, एखाद्या समाजाला आरक्षण देण्याची आश्वासने तुम्ही देत आहात तर त्या समाजाला आरक्षणाची खरंच आवश्यकता आहे का ? याविषयीचा सविस्तर लेखा जोखा प्रमुख पक्षांनी प्रशासनाकडे निवडणुकीपूर्वी प्रतिज्ञा पत्रासह सादर करणे बंधनकारक करावे. या आश्वासनांच्या पूर्तीवर नियंत्रण ठेवणारे आणि त्यांना वेळोवेळी जाणीव करून देणारे स्वतंत्र मंडळ असावे. आश्वासनांची वेळेत पूर्ती न करणाऱ्यांना दंडित करण्याचे सुद्धा प्रावधान असावे. असे काही केल्याशिवाय जनतेला त्यांच्या बहुमोल मताचा मोबदला मिळणार नाही.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## रक्त द्या रक्त ! रक्तदान करा
## जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, ठाणे :** ठाणे - मुंबई शहरामध्ये गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने गुरुवार, दि.६ नोव्हेंबर २०२४ पासून रक्तपेढी विभाग (ब्लड बँक), सिव्हिल रूग्णालय ठाणे, प्रादेशिक म नोरुग्णालया जवळ, ठाणे येथे रक्तदान शिबिराचे दररोज आयोजन करण्यात येणार आहे.

तरी इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी केले आहे.

## वचन नामा..

जाहीर जाहीरनामा
कायखरोखर उदिष्ट
प्राप्तकरायची सत्ता
विविक्षित जे निर्दिष्ट

सोपे सरळ विवेचन
कलम हर अक्लिष्ट
आकर्षक मांडणी रे
लेखक हवा उत्कृष्ट

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

सर्वांसाठी सर्वकाही
रे प्रत्येक जण संतुष्ट
नाराज ना हो समाज
कसले न यावे वितुष्ट

बळीराजा वीकपॉइंट
भक्कम हवे परिशिष्ट
उच्च दर्जा सर्वोत्तम रे
महिलावर्गास विशीष्ट

रोजगार नाजूक प्रश्न
वायदा करा समाविष्ट
आरक्षणास्तवबांधील
राहीन म्हणा एकनिष्ठ

कपोलकल्पितप्रकल्प
जोडावी मोठालीलिस्ट
लाडाचा भाऊ बहीण
वृध्दांनाही द्यावे गिफ्ट

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## ऐरोली व बेलापूर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक कार्याचा निरीक्षकांकडून आढावा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रियेच्या निरीक्षणासाठी निवडणूक निरीक्षक त्रिलोचन मांझी यांनी नवी मुंबई महानगर पालिका मुख्यालयाला भेट देत विशेष बैठकीत सविस्तर आढावा घेतला.

आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या समवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.अमोल शिंदे तसेच निवडणूक कामकाजाशी संबंधित विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता याप्रसंगी उपस्थित होते. आयुक्तांनी मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची तसेच मतदान केंद्रांवर पुरविण्यात येणाऱ्या पिण्याचे पाणी, मोबाईल प्रसाधनगृहे, रॅम्प, व्हिलचेअर, मेडिकल कीट व इतर आवश्यक सुविधांची माहिती दिली.

निवडणूक निरीक्षक त्रिलोचन मांझी यांनी काही मतदान केंद्रांच्या जागांची पाहणी केली व आढावा बैठकीप्रसंगी मतदान प्रक्रिया सुलभतेने पार पडावी यादृष्टीने आधीपासूनच काळजी घेण्याच्या सूचना केल्या. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत आणि जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मतदान करण्याचा संदेश पोहचविण्यासाठी स्वीप कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवून त्यामध्ये विविध प्रसार माध्यम ांचा वापर करण्याचे त्यांनी सूचित केले. मतदान केंद्रावरील रांगाचे नियोजन ही महत्वाची बाब असल्याचे सांगत याकरिता महानगर पालिकेने एनएसएस व एनसीसी विद्यार्थ्यांची मदत घेण्याचे केलेले नियोजन उत्तम असल्याचे सांगितले. मतदारांना मतदार चिठ्ठ्या वाटपाचे काम म तदानापूर्वी १०० टक्के पूर्ण करण्याकडे विशेष लक्ष द्यावे असेही त्यांनी सूचित केले.

## मतदानासाठी ओळखीचा पुरावा म्हणून १२ कागदपत्र ग्राह्य धरणार

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.०७, लातूर :** भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रम ानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघ २० नोव्हेंबर२०२४ रोजी मतदान होणार आहे. यावेळी मतदाराच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदान ओळखपत्रा शिवाय आणखी १२ कागदपत्रे ग्राह्य धरण्याचा सूचना भारत निवडणूक आयोगाने २१ अक्टोबर २०२४ रोजी पत्रानुसार प्राप्त झाल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ भारत कदम यांनी कळविले आहे. छायाचित्रसहित मतदान ओळखपत्र ( इपिक कार्ड) मिळालेले मतदार मतदानादिवशी हे मतदान केंदावर आपले हे मतदार ओळखपत्र ओळखीचा पुरावा म्हणून सादर करतील. या शिवाय ज्याचाकडे मतदान ओळखपत्र नाही आशा मतदाराना आपली ओळ पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने ग्राह्य

धरलेल्या१२ कागदपत्रापैकी कोणतेही एक ओळखपत्र सादर करावे लागेल. ही कागदपत्र सादर करावे लागेल ही कागदपत्र मतदान केंदारवर दाखवल्यानंतर त्यांना मतदान करता येणार आहे.प्रवाशी भारतीय मतदारांनी त्याची ओळख पटविण्यासाठी त्याचा केवळ मुळे पासपोर्ट आवशक राहील. मतदाराच्या ओळखीचा पुरावा म्हणून मतदार माहिती चिठी ग्राह्य असणारना नाही. याची मतदारांनी नोद घावी, असे डॉ कदम यांनी सांगितले

**मतदान ओळखपत्राला प्रर्यायी १२ कागदपत्रे**

आधारकार्ड,मनरेगा जॉब कार्ड,बँक किवा पोस्टा ऑफिस ने जरी केलेले छायाचित्रसह पासबुक, कामगार मत्रालयाच्या योजने अंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, रजिस्टर जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारे नॅशनल पोप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्म ार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शनदस्तऐवज, केंद्र अथवा राज्य सरकार किवा सार्वजनिक उपक्रमअथवा पब्लिकलिमिटे कंपन्या कर्मचारी यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र,खासदारांनी अथवा आमदारांनी जरी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र भारत सरकारच्या सामजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालया जारी केलेले विशेष विकालंगा प्रमाणपत्र.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महाबळेश्वर मध्ये पांढऱ्या रंगाच्या शेकरूचे दर्शन



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०७, महाबळेश्वर :** महाबळेश्वर मध्ये जंगलं परिसरात वन्य जीवांचे अस्तित्व असून या वन्यजीवा मध्ये प्रमुख आकर्षण हे येथे आढळणाऱ्या महाराष्ट्राचा राज्य प्राणी शेकरुचे दर्शन महाबळेश्वकरांना पाहवयास मिळाले. खारी पेक्षा आकाराने मोठी असणारी खार म्हणजे शेकरू महाबळेश्वर परिसरा मध्ये शेकरू मोठ्या प्रमाणात आढळतात बऱ्याचदा येथे फिरताना सहज झाडाच्या फांद्यांवरून उडया मारताना त्याचे दर्शन होते. झाडावरील फळे, फुले, बिया हा त्याचा मुख्य आहार तर झाडाच्या सुरक्षित उंचीवर सुक्या फांदया व भरपूर पाने यांच्या पासून मोठे गोल आकाराचे घरटे बांधतो.

अनेकदा वन्य प्राण्यांमध्ये मेलानीनच्या कमतरतेमुळे त्वचेचा रंग अर्धवट पांढरा किंवा पूर्ण पांढरा होत असतो. सहसा दुर्मिळ अशा पांढऱ्या शेकरूचा दर्शन क्वचितच होते. तर महाबळेश्वर येथील तहसील कार्यालय परिसरात झाडाच्या फाद्यावरून उड्या मारताना काल पुन्हा एकदा पांढऱ्या शेकरूचे दर्शन झाले असून या आधी ही महाबळेश्वरच्या जंगल परिसरात त्याचे दर्शन झाले होते. या परिसरात कार्यालयीन कामानिमित्त येणाऱ्या लोकांनी मोठ्या कुतूहलाने त्याचे व्हिडिओ व फोटो काढले.

## महाविकास आघाडीचे उमेदवार सुभाष भोईर यांचा १४ गावात प्रचार रॅलीचे आयोजन




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, चौदा गाव (ठाणे) :** १४४ कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे महविकास आघाडीतर्फे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार श्री सुभाष गणू भोईर यांच्या प्रचारार्थ गुरुवार दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सकाळी ९.३० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत विधानसभा मतदारसंघातून प्रचार रॅलीचे आयोजन केलेले आहे. प्रचार रॅलीचा मार्ग- बाळे मंदिर, बाळेगाव, वडवली, नारीवली, वाकळण, बामर्ली, निघू, नावली, दहिसर, नागाव, ठाकूरपाडा, कर्मनगरी, दहिसर मोरी, मोकाशी, पाडा, भंडार्ली, मानिकपाडा, उत्तरशिव, पिंपरी गावात सभा घेऊन समाप्ती होणार आहे. यासाठी मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे पदकारी मोठ्या संख्येने उपस्थित असणार आहेत.

## शालेय राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी आराध्यची निवड



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०७, मुंबई :** शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे दि.२९ ते ३१ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या शालेय राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत कु.आराध्य अमरनाथ कडू याने सुवर्णपदक व कु. खुशी महेश मळेकर हिने कास्यपदक मिळवले. कु.आराध्य अमरनाथ कडू याची विदिशा (मध्य प्रदेश) येथे दि. ७ ते १३ नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. संपूर्ण पराग शैक्षणिक संकुलातर्फे कु.आराध्य अमरनाथ कडू व मार्गदर्शक रोहित महादेव शिंदे यांचे अभिनंदन व राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# पालशेत गटात मनसेचे प्रमोद गांधी यांचा झंझावात प्रचार

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०७, गुहागर :** गुहागर विधानसभा मतदारसंघात निवडणुकांच्या प्रचारानी वेग घेतला असून याठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार प्रमोद गांधी यांचा प्रचार लक्षवेधी ठरत आहे. बुधवार दिनांक ०६ नोव्हेंबर २०२४ रोजी मनसेचा पालशेत जि. प.गटात प्रचार रॅली काढण्यात आली होती.

पालशेत, निवोशी, अडूर, कोंडकारूळ, पोमेंडी, वेळंब, जानवळे आदी परिसर गावात गांधी यांची प्रचार रॅली काढण्यात आली. दरम्यान अनेक ठिकाणी त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पालशेत येथील मच्छी विक्री करणाऱ्या महिलांनी आपल्या व्यथा मांडताना सांगितले की आमचा



पाण्यातील हा मच्छिमारी व्यवसाय असून, कधी मच्छी मिळते, कधी मिळत नाही, आमचा संपूर्ण उदरनिर्वाह हा मच्छिमारी व्यवसायावर अवलंबून या व्यावसायात अनेक वेळा आर्थिक झळ सोसावी लागत आहे.येथील आजी-माजी लोकप्रतिनिधींनी आमचा समाज नेहमीच उपेक्षित ठेवला असल्याची मच्छि विक्री करणाऱ्या महिलांनी गांधी यांच्याकडे व्यथा मांडल्या.

✻ पालशेत दत्तमंदिर येथे प्रमोद गांधींचे पालशेत-निवोशी विभागाच्या वतीने स्वागत करून प्रचाराला सुरुवात

✻ पालशेत येथील मच्छी विक्री करणाऱ्या महिलांच्या व्यथा जाणून घेण्यात आल्या.

✻ दुकानदारांच्या भेटी

✻ रात्री निवोशी भेलेवाडी ग्रामस्थांची भेट घेऊन समस्या जाणून घेण्यात आल्या.

# डहाणू विधानसभा महायुतीचे उमेदवार विनोद मेढा यांचा प्रचारास जोरदार सुरुवात

**अक्षराज : हरी कापसे**

**दि.०७, तलासरी :** तलासरी- डहाणू विधानसभा(१२८-अज)करिता आरक्षित असून या मतदार संघात एकूण ६ उमेदवार रिंगणात उभे आहेत त्यामध्ये मुख्य लढत भाजपाचे विनोद मेढा आणि सिपीएम चे विनोद निकोले या दोघामध्ये आहे. विनोद मेढा व पक्षाचे पदाधिकारी यांनी आज पासून प्रचाराची सुरुवात चारोटी विवळवेढे येथील सुप्रसिद्ध श्री महालक्ष्मी मातेच्या चरणी आशीर्वाद व नारळ फोडून करण्यात आली.या निवडणुकीत माजी आमदार कै. पास्कल धनारे यांच्या पत्नी मीना धनारे आणि शिवसेना (शिंदे) पक्षातून भाजपात आलेले माजी आमदार अमित घोडा यांच्या नावाची चर्चा सुरु होती.परंतू विनोद मेढा यांना भाजपा कडून उमेदवारी मिळाली. यांचे वडील सुरेश मेढा रा.झरी हे भाजपाचे दिवंगत जेष्ठ नेते खासदार कै.चिंतामण वनगा यांचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत.

त्यांचा वारसा जपत खासदार कै. चिंतामण वनगा व आमदार कै.पास्कल धनारे व कै. लक्ष्मण वरखंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपर्कात अनुभव घेत पुढील



पक्षाच्या कार्याला उभारी आली. २०१५साली तलासरी तालुक्यातील झरी ग्रामपंचायत निवडणुकीत विनोद मेढा व त्यांच्या कार्यकर्त्यांनी अतिशय मेहनत घेऊन सिपीएम पक्षांच्या बालेकिल्ल्यात ताब्यात असलेली झरी ग्रामपंचायत पूर्णपणे बहुमतांनी भाजपाकडे आणल्याने तेव्हापासून बहुचर्चेत असलेले विनोद मेढा यांना तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. तालुक्यात पक्षाकडून अनेक कामे केल्याने त्यांना दोन वेळेस तालुकाध्यक्ष पद भूषविले आहे.तालुक्यात पक्ष सांभाळण्या करिता जेष्ठ पदाधिकारी नसतांना विनोद मेढा व सुरेंद्र निकुंभ, (पप्पू) बबला धोंडी व इतर कार्यकर्ते यांनी मिळून कार्यालयात आलेल्या स्थानिकांची, बाहेरील जनतेची व कार्यकर्त्यांची अनेक कामे करीत जेष्ठयांची उपस्थिती न जाणवता जिल्हा परिषद सदस्य, नगरसेवक, पूर्ण ग्रामपंचायती निवडून आणल्या.

तलासरी तालुक्यात भाजपाला पुढे नेले. विनोद मेढा यांच्या विजयासाठी तलासरी, डहाणू तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना कठोर परिश्रम घ्यावे लागणार आहे.डहाणूत सध्या माकप पक्षाचे वर्चस्व त्यांना महाविकास आघाडी व आदिवासी संघटनेचा पाठिंबा आहे.तर विनोद मेढा यांना महायुतीतील घटक पक्षांचा पाठिंबा आहे. यावेळी भाजपाचे प्रांत सदस्य बाबाजी काठोले, जिल्हयाध्यक्ष भरत राजपूत खासदार डॉ.हेमंत सवरा, उमेदवार विनोद मेढा, राम ठाकरे, भानुदास भोये, सुरेंद्र निकुंभ, बबला धोंडी, कना गडग, सुनील टोकरे, शैलूताई कुऱ्हाडा, जयवंती घोरखना, इतर इत्यादीच्या उपस्थितीत डहाणू मसोली येथील हॉल मध्ये सभेत महायुतीचे उमेदवार विनोद मेढा यांना आपल्या भागातील विकास करिता बहुमतांनी विजयी करा असे उपस्थित कार्यकर्ते व जनतेस आव्हान करण्यात आले. यावेळी अनेक पक्षाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला.

# ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात पुढील आठवडाभर होणार रक्तदान शिबिराचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, ठाणे :** असे म्हणतात की, एका व्यक्तीने रक्तदान केल्यानंतर त्या रक्ताचे सर्व महत्त्वाचे घटक बाजूला करून पाच लोकांचा जीव वाचविला जाऊ शकतो. म्हणूनच रक्तदान हेच श्रेष्ठ दान असे मानले जाते. मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा तुटवडा भासत होता. अशात दिवाळीला नातेवाईकांकडे जाऊन त्यांची विचारपूस करत त्यांना आठवणीत राहील, अशी भेट देण्यापेक्षा ठाणे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांच्या प्रेरणादायी विचारातून दिवाळी निमित्ताने वि.सा.सामान्य रुग्णालय येथे भेट देऊन रक्तदान करण्याचे आवाहन



केले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत गुरुवार, दि.६ नोव्हेंबर २०२४ पासून पुढील एक आठवडा रक्तपेढी विभाग (ब्लड बँक), सिव्हील रूग्णालय, ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाजवळ, ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

या प्रेरणादायी विचारांना कृतीत आणून जनजागृतीचे उत्तम उदाहरण म्हणजे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धीरज महांगडे यांनी सर्वप्रथम रक्तदान करून या शिबिराची सुरुवात केली.

याप्रसंगी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) डॉ.मृणाली राहुड, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ.राजू काळे, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ.गिरीश चौधरी, अधिसेविका श्रीमती प्रतिभा बर्डे या सर्वांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना आवाहन करून जनजागृती केली.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी उपस्थित सर्व रुग्णालयीन अधिकारी व कर्मचार्यांचे आणि रक्तदात्यांचे कौतुक करून मनोबल वाढविले.

तरी इच्छुक रक्तदात्यांनी, स्वयंसेवी संस्थांनी, महाविद्यालयीन तरूण-तरूणींनी स्वेच्छेने रक्तदान करण्यास पुढाकार घ्यावा आणि गरजू रुग्णांना मदत करावी व रक्तदान करून या सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी केले आहे.

# माझिया माहेरा जा कवितेस चालदाते ! पु.ल.देशपांडे जयंती विशेष...

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे म्हणजेच पु.ल.देशपांडे ऊर्फ भाई ऊर्फ पुल हे लोकप्रिय मराठी लेखक, नाटककार, नट, कथाकार व पटकथाकार, दिग्दर्शक आणि संगीत दिग्दर्शक होते. त्यांना महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असे म्हटले जाते. त्यांच्या आद्याक्षरांवरून महाराष्ट्रात ते पु.ल.म्हणून ओळखले जातात. त्यांचे मराठी भाषेवर विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे अनेक किस्से आहेत. त्यांच्यावर मराठीत भाई हा चित्रपट बनला आहे. या चित्रपटाचे दोन भाग आहेत. ते हजरजबाबीही होते, त्यामुळे त्यांची शेकडो वाक्सुमने आणि विनोदी किस्से आहेत. मराठी साहित्य व संगीतातील योगदानाव्यतिरिक्त पुलंचे आकाशवाणी, दूरदर्शन, नाट्य व चित्रपट क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. ते उत्तम संवादिनी वादक होते, तसेच त्यांनी काही चित्रपटांचे संगीत दिग्दर्शनही केले. पु.ल.देशपांडे यांचा जन्म दि.८ नोव्हेंबर १९१९ रोजी मुंबईतील गावदेवी या भागात चांद्रसेनीय कायस्थ प्रभू- सीकेपी कुटुंबामध्ये झाला. त्यांचे बालपण जोगेश्वरी येथील सारस्वत कॉलनीत गेले. त्यांनी पार्ले टिळक विद्यालयात शालेय शिक्षण घेतले आणि नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात आणि सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयात ते शिकले. सन १९४०च्या दशकात साहित्यक्षेत्रात पदार्पण करण्यापूर्वी ते काही काळ शाळेमध्ये शिक्षक होते. सन १९४६ साली ते सुनीताबाईंशी विवाहबद्ध झाले. लेखक आणि कविवर्य वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी हे त्यांचे आजोबा होते. ते साहित्याचे जाणकार होते. रवीन्द्रनाथ टागोर लिखित गीतांजली हा काव्यसंग्रह त्यांनी अभंग गीतांजली या नावाने मराठीत भाषांतरित केला होता.

देशपांडे यांचे वडील हे अडवाणी कागद कंपनीत दीडशे रुपये पगारावर फिरते विक्रेते होते. फिरतीवर असताना जेवणाखाण्याचा भत्ता मिळे. एकदा कोल्हापूरला असताना ते बहिणीकडे जेवले. त्यादिवशी त्यांनी भत्ता घेतला नाही, अशी आठवण पु.ल.देशपांडे यांनी सांगितली. ते लहानपणापासूनच धष्टपुष्ट होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी ते पाच वर्षांच्या मुलाएवढे दिसत होते. ते हुशार होते आणि सतत काही ना काही करत असत. त्यांना स्वस्थ बसण्यासाठी घरचे लोक पैसा देऊ करायचे, पण हे त्यांना जमले नाही. आजोबांनी लिहून दिलेले आणि त्यांनी पाठ केलेले दहा-पंधरा ओळींचे पहिले भाषण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या शाळेत हावभावासहित खणखणीत आवाजात म्हणून दाखवले.

सात वर्षे अशी भाषणे केल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षापासून ते स्वतःची भाषणे स्वतःच लिहू लागले. ते इतरांनाही भाषणे आणि संवाद लिहून देऊ लागले. त्यांना घरात खुप वाचन करायला व रेडिओवरील संगीत ऐकायला मिळाले. त्यांच्या घरी संगीताच्या बैठकाही होत असत. ते घरीच बाजाची पेटी शिकले. टिळक मंदिरात एकदा बालगंधर्व आले असता त्यांनी पेटी वाजवून दाखवली. बालगंधर्वांनी शाबासकी दिली व भावी कलाजीवनासाठी शुभेच्छा दिल्या. लोकांच्या वागण्यातील विसंगती व हास्यास्पद गोष्टी हेरून ते त्या लोकांच्या नकला करायचे. म्हणून घरी कुणी आले असता पुरुषोत्तम जवळ नसलेलाच बरा, असे आईला वाटत असे. त्यांची आई कारवारी, वडील कोल्हापूरचे आणि बहीण कोकणात दिलेली, त्यामुळे घरात भोजनात विविधता असे. यातूनच ते खाण्याचे शौकीन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर ते गाण्याच्या, पेटीच्या व अन्य शिकवण्या घेऊ लागले. ते शाळेत असल्यापासूनच भावगीते गायचे आणि गीतांना चाली लावायचे. कॉलेजात असताना त्यांनी राजा बढे यांच्या माझिया माहेरा जा या कवितेला चाल लावली. आज ते गाणे मराठी भावसंगीतातील अनमोल ठेवा समजला जातो. ग.दि. माडगूळकरांनी लिहिलेल्या व भीमसेन जोशींनी गायलेल्या इंद्रायणी काठी या गीताला त्यांनी चाल लावली होती. तेही गाणे अजरामर झाले.

कॉलेजमध्ये असताना पु.ल. गायकांना साथ करीत. ते पेटी वाजवत, त्यांचा भाऊ रमाकांत तबला आणि मधुकर गोळवलकर सारंगी वाजवीत. मिळालेले १५ रुपये तिघेही वाटून घेत. पार्ले टिळक विद्यालयातून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून ते मुंबईतील इस्माईल युसुफ कॉलेजातून इंटर व सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी झाले. कलेक्टर कचेरी व प्राप्तीकर विभागात ते काही काळ नोकरी करून पुण्याला आले. त्यापूर्वी ते पेट्रोल रेशनिंग ऑफिसमध्ये कारकून आणि ओरिएंटल हायस्कूलमध्ये शिक्षक होते. पुण्याला आल्यावर त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून बीए आणि एमए केले. याच महाविद्यालयात असताना त्यांनी चिंतामण कोल्हटकरांच्या ललित कलाकुंज व नाट्यनिकेतन या नाट्यसंस्थांच्या नाटकांतून भूमिका करायला सुरुवात केली. सन १९३७पासून नभोवाणीवर पु.ल.देशपांडे छोट्या मोठ्या नाटिकांत भाग घेऊ लागले. त्या वर्षी त्यांनी अनंत काणेकरांच्या पैजार या श्रुतिकेत काम केले. सन १९४४ साली त्यांनी लिहिलेले पहिले व्यक्तिचित्र भट्या नागपूरकर हे अभिरुची या नियतकालिकातून प्रसिद्ध झाले. याच दरम्यान त्यांनी सत्यकथामध्ये जिन आणि गंगाकुमारी ही लघुकथा लिहिली. सन २०१४मध्ये प्रकाशित झालेले बटाट्याची चाळ हे त्यांचे विनोदी पुस्तक प्रसिद्ध आहे. सन १९४८ साली त्यांनी तुका म्हणे आता हे नाटक आणि बिचारे सौभद्र हे प्रहसन लिहिले.

दूरदर्शनच्या पहिल्यावाहिल्या प्रसारणासाठी पंडित नेहरूंची दूरदर्शनसाठी मुलाखत घेणारे पुलं हे भारतीय दूरदर्शनचे पहिले मुलाखतकार होते. साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी या दोहोंचे पुरस्कार मिळवणाऱ्या मोजक्या प्रतिभावंतात त्यांचा समावेश होतो. मुंबईच्या नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स- एनसीपीए या संस्थेत पुलंनी अनेक प्रयोग केले. संशोधकांना आधारभूत होतील असे असंख्य संदर्भ, कलांचा इतिहास, ध्वनिफिती, मुलाखती, लेख आदी बरेच साहित्य त्यांनी जमा करून ठेवले आहे. मराठी नाटकाचा आरंभापासूनचा इतिहास त्यांनी अशा जबरदस्त प्रयत्नान्ती जमा केला की त्यांच्यावरून स्फूर्ती घेऊन भारतातील अनेक जणांनी त्यांच्या त्यांच्या प्रांतांतील कलांचा इतिहास जमा करून नोंदवायची सुरुवात केली. एनसीपीएच्या रंगमंचावर त्यांनी देवगाणी, बैठकीची लावणी, दोन पिढ्यांची गायकी असे काही अनोखे कार्यक्रम सादर केले. ते भाषाप्रेमी होते. त्यांना बंगाली, कानडी येत असल्याने ते त्या त्या समाजातील लोकांत सहज मिसळत. दि.१२ जून २००० रोजी वयाच्या ८१व्या वर्षी पुण्यातील प्रयाग रुग्णालयात पुलंचे निधन झाले.

**!! जयंती दिनी त्या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाला साष्टांग दंडवत प्रणाम !!**

**- संकलन व शब्दांकन -**

**श्री.कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**

**ता. जि. गडचिरोली.**

**९४२३७१४८८३.**

